१५ व्या केंद्र वित्त आयोगाच्या अनुदानातुन
केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट
ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टल वरुन वस्तु व
सेवांच्या खरेदीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**ग्रामविकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०२३/प्र.क्र. ६१ /वित्त-४**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक - ०२ जानेवारी, २०२४**

**संदर्भ:** ग्रामविकास विभाग अर्धशासकीय पत्र क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र. ६१ /वित्त-४, दि. १८.०५.२०२३.

**परिपत्रक**

केंद्र शासनाने गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) हे पोर्टल वस्तु व सेवांच्या खरेदीसाठी विकसित केलेले आहे. GeM पोर्टलवर राबविण्यात येणारी खरेदी पध्दती ही मानवी हस्तक्षेपाशिवाय असून संपूर्णत: ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येणार आहे. यामुळे, खरेदी कार्यपध्दतीत पारदर्शकता येऊन नेमक्या व योग्य नामांकित दर्जाच्या वस्तुंचा पुरवठा वाजवी किंमतीत उपलब्ध होणार आहे. गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) या पोर्टलच्या वापरामुळे शासकीय विभागाव्दारे होणाऱ्या खरेदी प्रक्रियेच्या कालावधीमध्ये बचत, उत्कृष्ठ वस्तूंचा पुरवठा, वाजवी किंमत व संपूर्ण खरेदी प्रक्रियेमध्ये पारदर्शकता येणार आहे. ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्थाव्दारे खरेदी केल्या जाणाऱ्या नेहमीच्या वस्तु GeM वर सहज उपलब्ध आहेत.

पंचायतीराज मंत्रालय, भारत सरकार यांनी राज्यातील सर्व स्तरावरील ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्थांनी १५ व्या केंद्र वित्त आयोगाच्या अनुदानातून वस्तु व सेवा यांची खरेदी GeM पोर्टलवरून करण्याचे निर्देश दिले आहे. आपण त्वरीत GeM पोर्टलवर नोंदणी करुन घ्यावी यापुढे सर्व खरेदी प्रक्रिया GeM पोर्टलवरून करण्यात याव्यात.

GeM पोर्टलवरून खरेदी करतांना उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-१०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि. १ डिसेंबर, २०१६ च्या मार्गदर्शक सुचनांचे काटोकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

तसेच eGramSwaraj (eGS)-GeM पोर्टल संबंधित मदत हवी असल्यास श्री. राम प्रताप, संचालक (Pratap.ram@nic.in) आणि श्री. मोहित गुप्ता, सल्लागार (mohit.gupta२०@nic.in) पंचायतीराज मंत्रालय, भारत सरकार यांच्याशी संपर्क साधावा.

(राजेश भोईर)
उप सचिव, ग्रामविकास विभाग

प्रति.

मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद, महाराष्ट्र राज्य.

प्रत.

१. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, सर्व जिल्हा परिषद, महाराष्ट्र राज्य.
२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत) सर्व जिल्हा परिषद, महाराष्ट्र राज्य.
३. सर्व कार्यासने, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई.
४. निवड नस्ती, का.वित्त-४